| MHKO100000542008 | नियमित दिवाणी दावा क्रमांक ११/२००८ मधील निशाणी क्र. ८० वरील आदेश (श्री. भैरु राघू कांबळे विरुध्द श्री. सखाराम रामचंद्र कांबळे वगैरे ) |
|---|---|

वादी क्र. १ तर्फे वारस यांनी सदरचा अर्ज वादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ होऊन मिळणेसाठी व अबेंटमेंट रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

**२.** वादी क्र. १ तर्फे वारस यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

**३.** वादी क्र. १ तर्फे वारस यांचे असे कथन आहे की, वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द सदरचा दावा हक्कज्ञापनासाठी व कायम मनाई ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. वादी क्र. १ भैरु राघू कांबळे हे दिनांक ३०/०४/२०२१ रोजी मयत झाले आहेत. प्रस्तुतकामी वारस रेकॉर्डवर आणणेसाठी विलंब झालेला आहे. वादी क्र. १ तर्फे वारस यांनी वारस रेकॉर्डवर आणणेसाठी जाणुनबुजून टाळाटाळ केलेली नाही. दावा चालू असताना जागतीक महामारी कोविड-१९ चा प्रसार सगळीकडे झाल्यामुळे व त्या कालावधीमध्ये मुळ वादी हे मयत झालेमुळे त्याचे मृत्यूप्रमाणपत्र उपलब्ध न झालेने त्यांचे वारसांना आपल्या वकीलांना भेटून माहिती देता आली नाही. प्रस्तुतचा अर्ज मंजूर झालेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट नामंजूर झालेस वादी क्र. १ तर्फे वारस यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब वादी यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ होवून अबेटमेंटचा आदेश रद्द करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**४.** प्रतिवादी यांनी आपले म्हणणे सादर करुन असे कळविले आहे की, वादीचा अर्ज चुकीचा व बेकायदेशिर आहे. अर्जात नमुद केलेली कारणे चुकीची आहेत. वादीने सदरचे काम लांबणीवर टाकण्याच्या उद्देशानेच मुदतीत वारस रेकॉर्डवर आणलेले नाहीत. सबब वादी

अर्ज नामंजूर करणेत यावा व मंजूर करावयाचा झालेस वादी यांचेवर खर्च बसविणेत यावा अशी विनंती केली आहे.

**५.** वादी यांनी सदरचा दावा हक्कज्ञापनासाठी व कायम मनाई ताकीदीसाठी दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी वादी क्र. १ यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. त्याकरीता वादी यांनी केलेला विलंब माफ होवून अबेटमेंटचा आदेश रद्द होणे गरजेचे आहे. वादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर घेतल्यामुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. वादीतर्फे वारस यांनी वारस रेकॉर्डवर घेणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे वादी यांना त्याचेवर त्यांनी केलेल्या उशीरासाठी खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आ दे श**

१. वादी क्र. १ तर्फे वारस यांचा निशाणी क्र. ८० वरील अर्ज, प्रतिवादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये ४००/- (अक्षरी रुपये चारशे मात्र ) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**२. प्रकरण १० वर्षापेक्षा जास्त जुने असलेने दोन्ही पक्षकारांनी प्रकरण जलदगतीने चालविणेबाबत योग्य त्या पुढील स्टेप्स/पुर्तता त्वरीत घ्याव्यात.**

(खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय घोषित करण्यात आला)

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ११/११/२०२१

(श्रीमती एस.एन.निकम)
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज

MHKO100000542008

**नियमित दिवाणी दावा क्रमांक ११/२००८ मधील**
**निशाणी क्र. ८१ वरील आदेश**
**(श्री. भैरु राघू कांबळे विरुध्द श्री. सखाराम रामचंद्र कांबळे वगैरे )**

वादी क्र. १ तर्फे वारस यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता नियम २२ क्रम ४ प्रमाणे वादी क्र. १ **भैरु राघू कांबळे** यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दाखल केला आहे.

**२.** वादी क्र. १ तर्फे वारस यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

**३.** वादी क्र. १ तर्फे वारस यांचे असे कथन आहे की, वादी क्र. १ **भैरु राघू कांबळे** हे दिनांक ३०/०४/२०२१ रोजी मयत झाले आहेत. त्यांना अर्जात नमुद १अ ते १ड हे सरळ व कायदेशिर वारस असून याशिवाय अन्य कोणीही वारस नाही.

**४.** वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द हक्कज्ञापनासाठी व कायम मनाई ताकीद मिळणेसाठी दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी वादी क्र. १ यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. वादी क्र. १ तर्फे वारस यांनी निशाणी ८० वर वादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेबा विलंब माफीचा व अबेटमेंट रद्द होवून मिळणेचा अर्ज मंजूर करण्यात आला आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

१) वादी क्र. १ तर्फे वारस यांचा निशाणी क्र. १ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) **सदरचे प्रकरण हे १० वर्षापेक्षा जास्त जुने असलेने वादी क्र. १ तर्फे वारस यांनी वादी क्र. १ चे वारसाबाबत दाव्यात सत्वर दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत त्वरीत दाखल करावी.**

(खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय घोषित करण्यात आला)

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ११/११/२०२१

(श्रीमती एस.एन.निकम)
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज